# आठवणीतल्या गावातलं... 'सी विंड्स'



डॉ. जितेंद्र खेर

एक नयनरम्य गाव, साधी सुंदर घरं, घरासमोर प्रसन्न अंगण, गावाचा सुरेख रस्ता, प्रदूषणमुक्त स्वच्छ निर्मळ हवा, गावच्या मातीचा आणि चुलीचा सुगंध, नारळ-सुपारीच्या बागा, बागांसमोर सफेद मऊशार वाळूचा गालिचा आणि त्यापुढे आल्हाददायक निळा समुद्र... हे



सी विंड्स



गुहागर

दृश्य वर्णन ऐकून वाटतं, की हे तर आठवणीतलं गाव. हल्ली गावंही शहरी अनुकरण करू लागली आहेत, म्हणून म्हटलं 'आठवणीतलं गाव'. मात्र, समजा तुम्हाला अशा ठिकाणी जायचा योग आला, तर आवडेल का? आपण पैसे खर्च करून जग बघायला जातो, त्या जगाला भुलतो; पण आपल्याजवळही अशी काही भुलवणारी ठिकाणं आहेत आणि त्यातील एक म्हणजे कोकणातील निसर्गरम्य गुहागर.

पुणे, मुंबईपासून अगदी पाच ते सहा तासांच्या अंतरावर असलेलं गुहागर इथल्या सृष्टी सौंदर्यासाठी, बीचसाठी आणि मंदिरांसाठी प्रसिद्ध आहे. नैसर्गिक सौंदर्यता लाभल्यामुळे गुहागर हे एक उत्तम टुरिस्ट डेस्टिनेशन बनलं आहे आणि डॉ. जितेंद्र खेर यांचं 'सी विंड्स... द बीच हॉटेल' इथं राहण्याचा परफेक्ट पर्याय.

'सी विंड्स' हे आधुनिक सुखसोयींनी सुसज्ज आहे. इथल्या एसी-नॉन एसी डिलक्स, सुपिरियर, गार्डन रूम्स आणि स्वीट्स अशा प्रत्येक रूममधून तुम्ही सुरुवातीला वर्णिल्याप्रमाणे दृश्य अनुभवू शकता. इथं राहण्याबरोबर चविष्ट जेवणाची मजाही तुम्ही इथल्या एसी आणि गार्डन रेस्टॉरंटमध्ये लुटू शकता.

गुहागारातील व्याडेश्वर, दुर्गादेवी, उफराटा गणपती अशा विविध देवस्थानांपासून 'सी-विंड्स' अगदी हाकेच्या अंतरावर आहे. आधुनिक 'सी-विंड्स' गुहागरच्या सुंदर आणि साधेपणामध्ये जणू मिसळून गेलं आहे. इथं येणारे अनेक देशी-विदेशी पर्यटक याची ग्वाही देतात.

या सुंदर गावात तुम्ही तुमच्या कुटुंबासमवेत, मित्रांबरोबर सुंदर क्षण घालवू शकता आणि हे अनमोल क्षण वेचण्यासाठी आठवणीतल्या गावातलं 'सी-विंड्स' तुम्हाला साद घालत आहे.

येणार ना मग, तुमचे क्षण अविस्मरणीय करायला.

**संपर्क** : ०२२-२५४५१२३४, २५३०६२६३, ९९२०९९४२२९

**वेबसाइट** : www.seawinds.in